# किरण बेदी, केजरीवाल, प्रशांत भूषण, सिसोदिया चौघांना दूर करूया!

(पान १ वरून चालू)

मी हा ब्लॉग अजूनही 'अपलोड' केलेला नाही. या ब्लॉगमध्ये अण्णा यांचा सध्याची कोअर कमिटी बरखास्त करून नवीन कोअर कमिटी बनविण्याचा आदेशच होता, असे पत्रकार राजू परूळेकर यांनी जाहीर केले आहे. ही घटना घडल्यावर २४ ते ३० ऑक्टोबरदरम्यान अनेक प्रसंग घडले. अण्णांना न विचारताच अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनिष सिसोदिया यांनी गाझियाबाद येथे 'कोअर कमिटी'ची बैठक घेतली. नंतर हे सर्वजण राळेगणसिद्धीला आले. या चौघांनीही माझे अधिकार काढून घेण्याचा, अण्णांपासून दूर करण्याचा प्रयत्न केला. राळेगणसिद्धी येथे झालेली 'कोअर कमिटी'ची बैठक या तिघांनी लादलेली बैठक होती. या बैठकीत अण्णांना विचार मांडूच दिले नाहीत. अण्णांच्या बुद्धिला व शहाणपणाला वावच दिला नाही. या ३० ऑक्टोबरच्या बैठकांनंतरही अण्णा प्रक्षुब्ध होते. त्यांनी मला राळेगणसिद्धीतच स्वत:जवळ रहायला सांगितले. त्यानंतर बंद दाराआड माझी व अण्णांची बैठक झाली. त्यात अण्णांनी 'कोअर कमिटी' बनविण्याचे आदेश देणारा स्वत:च्या सहीचा ब्लॉग 'अपलोड' करायला सांगितला. तो मी अजूनही 'अपलोड' केलेला नाही. केजरीवाल, बेदी, प्रशांत भूषण व सिसोदिया यांनी कुमार विश्वास यांच्या खुबीने वापर करून घेतला, असे राजू परूळेकर यांनी आपल्या ब्लॉगवर सांगितले आहे.

## पत्रकार परिषदेत टर उडविली म्हणून अण्णांचे पत्र जाहीर केले

शुक्रवारी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात झालेल्या पत्रकार परिषदेत अण्णा हजारे यांनी आपण राजू परूळेकर यांच्याशी कधीही बोललो नाही व कोअर कमिटीच्या पुनर्रचनेबाबत कधीही राजू परूळेकरांना भेटलो नाही. राजू परूळेकर हे जे काही बोलत आहेत ती त्यांची स्वत:ची मत आहेत, असे सांगितले. दुरदर्शन चनलने तर राजू परूळेकर हे तर केंद्रीय मंत्रिमंडळाचे एजंट आहे असे म्हणताच पत्रकार परिषदेतील सर्वजण आणि बेदी, केजरीवाल, भूषण हे किदीकिदी हसल. म्हणूनच आपण हे आण्णांचे पत्रकार राजू परूळेकर यांनी सांगितले.